# बेताची परिस्थिती, तरीही स्वप्न मोठे; सिद्धीच्या यशापुढे अडथळे ठरले खोटे!



• आर्थिक अडचणींवर मात करत बारावीत ८३ टक्के गुण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

घरची परिस्थिती बेताची, वडिलांची खासगी कंपनीतील नोकरी आणि त्यातून मिळणाऱ्या मर्यादित उत्पन्नावर घराचा गाडा चालत असतानाही पेठ वडगाव (ता. हातकणंगले) येथील सिद्धी किरण परीट हिने जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर बारावी परीक्षेत ८३ टक्के गुण मिळवत यश संपादन केले. विशेष म्हणजे मराठी विषयात तिने तब्बल ९५ गुण मिळवून आपली छाप उमटवली आहे.

सिद्धी कोल्हापुरातील विवेकानंद कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहे. तिचे वडील किरण परीट हे खासगी कंपनीत नोकरी करत असून आई गृहिणी आहे. मर्यादित उत्पन्नात घरखर्च आणि मुलीचे शिक्षण सांभाळताना कुटुंबाला अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र, या परिस्थितीची जाणीव ठेवत सिद्धीने कधीही हार मानली नाही. दररोज चार ते पाच तास नियमित अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि आई-वडिलांचे कष्ट यांची जाणीव ठेवून तिने हे यश मिळवले. आर्थिक परिस्थितीमुळे अनेक गोष्टींची कमतरता जाणवत असतानाही तिने आपल्या स्वप्नांवर पाणी फिरू दिले नाही. आता पुढे सीए होण्याचे स्वप्न असल्याचे सिद्धीने सांगितले.

तरुण भारत संवाद | सोमवार, दि. ४ मे २०२६

# कोल्हापुरात ६ रोजी 'झीरो शॅडो डे'

प्रतिनिधी, कोल्हापूर

कोल्हापुरात बुधवार, ६ रोजी 'झीरो शॅडो डे'चा अनुभव घेता येणार असून या दिवशी दुपारी १२ वाजून २९ मिनिटे ११ सेकंदांपासून ते १२ वाजून ३० मिनिटांपर्यंत जवळजवळ ५० सेकंदांपर्यंत आपली सावली अदृश्य होणार असल्याची माहिती विवेकानंद महाविद्यालयाचे पदार्थविज्ञान पदव्युत्तर विभागाचे प्रोफेसर डॉ. मिलिंद मनोहर कारंजकर यांनी दिली.

डॉ. करंजकर म्हणाले, 'झिरो शॅं डो डे' ही घटना पृथ्वीच्या भौगोलिक स्थितीशी आणि सूर्याच्या आकाशातील स्थानाशी संबंधित आहे. कर्कवृत्त आणि मकरवृत्त या दोन वृत्तांच्यामध्ये राहणाऱ्या लोकांना वर्षातून दोन



वेळेला हा शून्य सावलीचा आनंद घेता येतो. मात्र जे लोक कर्कवृत्त, मकरवृत्त आणि विषुववृत्त या ठिकाणी राहतात. त्यांना वर्षातून एकदाच शून्य सावली दिवसाचा आनंद घेता येतो. तर कर्कवृत्ताच्या वरच्या भागात, मकरवृत्ताच्या खालच्या भागात राहणाऱ्या लोकांना मात्र शून्य सावली दिवसाचा आनंद घेता येत नाही.

## सावली होणार अदृश्य

आपल्या दैनंदिन जीवनात सावली हा एक नैसर्गिक भाग असतो. असं म्हटलं जातं की आपली सावली कधीच आपली साथ सोडत नाही परंतु मात्र वर्षातून काही विशिष्ट दिवस असे येतात, जेव्हा दुपारच्या ठराविक वेळी आपली अथवा कोणताही उभ्या वस्तूची सावली काही कालावधीसाठी पूर्णपणे नाहीशी होते. या अद्भुत घटनेला खगोल शास्त्रामध्ये शून्य सावली अथवा झिरो शॅडो असे म्हणत असल्याचें त्यांनी स्पष्ट केले.

वर्षातून तीन महिन्यांनी मकरवृत्तावर, नंतर तीन महिन्यांनी परत विषुववृत्तावर आणि परत तीन महिन्यांनी कर्कवृतावर आपणांस शून्य सावली दिवसाचा आनंद घेता येतो. मात्र कर्कवृत्त, मकरवृत्त या दोन स्थानांमध्ये जे लोक राहतात त्यांना वर्षातून दोनदा शून्य सावलीचा अनुभव घेता येतो. तसेच बरोबर तीन महिन्यांनी सूर्याच्या दक्षिणायन काळात ६ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२ वाजून ३९ मिनिटंपासून ५० सेकंदपर्यंत परत एकदा शून्य सावलीचा आनंद घेता येणार आहे.

पुण्य नगरी ■ गुरुवार, ७ मे २०२६ ■ कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेजचे बारावीत यश

**कोल्हापूर :** बारावी बोर्ड परीक्षेच्या निकालात कॉलेजने तिन्ही शाखांमध्ये यशाची परंपरा राखत गुणवत्तेचा झेंडा फडकवला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयातर्फे अभिनंदन करण्यात आले. विज्ञान शाखेचा निकाल ९९.२७ टक्के लागला असून, प्रथमेश काकडे याने ९४.६७ टक्के गुण मिळवून कॉलेजमध्ये प्रथम येण्याचा बहुमान मिळवला. श्रद्धा सुतार (९२.१७ टक्के) द्वितीय, तर संचिता कुलकर्णी (९२.०० टक्के) हिने तृतीय क्रमांक पटकावला. वाणिज्य (इंग्रजी माध्यम) शाखेचा निकाल ९२.७४ टक्के लागला. यामध्ये आर्या दीक्षित व अनिष संकपाळ यांनी ९५.६७ टक्के गुणांसह संयुक्तपणे प्रथम क्रमांक पटकावला. मनुश्री शहा (९५.३३ टक्के) दुसरी, तर स्वालिया चौधरी (९३.३३ टक्के) तिसरी आली. वाणिज्य (मराठी माध्यम) विभागात सना देसाई (८८.६७ टक्के) प्रथम, साक्षी तोरस्कर व रणवीर अनपट (८६.०० टक्के) द्वितीय, तर स्नेहल माने (८४.६७ टक्के) हिने तृतीय क्रमांक मिळवला. कला शाखेचा निकाल ८७.६७ टक्के लागला. यामध्ये आभा कपाले (८७.६७ टक्के) प्रथम, यशोधन अनुसे (८७.३३ टक्के) द्वितीय, तर संस्कृती रानगे (८४.८३ टक्के) हिने तृतीय क्रमांक संपादन केला. विशेष म्हणजे, अकौंटन्सी विषयामध्ये तीन, कॉमर्स मॅथ्समध्ये दोन, सायन्स मॅथ्समध्ये दोन, तर जिऑलॉजी विषयात नऊ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवून विशेष प्रावीण्य मिळवले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची विद्यासमिती आणि कॉलेजने राबवलेल्या विशेष स्कॉलर बॅचच्या प्रयत्नामुळे हे यश मिळाले असून विद्यार्थ्यांचा अभिमान वाटतो, असे मत प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी स्कॉलर बॅचप्रमुख प्रा. एस. एन. साळुंखे, प्रा. एस. एल. पाटील, प्रा. वर्षा महाडिक, प्रा. भाग्यश्री पाटील, प्रा. विश्वंभर कुलकर्णी, प्रा. सुभाष रानमाळे, विभागप्रमुख प्रा. शिल्पा भोसले, प्रा. एम. आर. नवले आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

तरुण भारत संवाद
गुरुवार, दि. ७ मे २०२६

नेहमी प्रत्येकाच्या सोबत असणाऱ्या सावलीने बुधवारी दुपारी काही क्षणासाठी साथ सोडल्याचे चित्र पहायला मिळाले. खगोल शास्त्राच्या अभ्यासानुसार याला झिरो शॅडो किंवा शुन्य सावली असे म्हंटले जाते. त्यानुसार सुमारे ५० सेकंदासाठी सावली गायब झाल्याचा अनुभव कोल्हापुरकरांनी घेतला. याची शास्त्रीय अभ्यासानुसार नोंद घेतली असल्याचे विवेकानंद महाविद्यालयाचे पदार्थविज्ञान पदव्युत्तर विभागाचे प्रोफेसर डॉ. मिलिंद कारंजकर यांनी दिली.



## कोल्हापुरकरांनी घेतला झीरो शॅडोचा अनुभव

# सावलीने सोडली साथ!

- ५० सेकंदासाठी सावली झाली गायब
- शाळा, महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी प्रात्याक्षिके
- आता पुन्हा तीन महिन्यानंतर मिळणार अनुभव





कोल्हापूर : विवेकानंद कॉलेज येथे शास्त्रीय अभ्यासाद्वारे विद्यार्थ्यांनी झीरो शॅडोचा अनुभव घेतला. शहरात बुधवारी दुपारी काही क्षणांसाठी सावली गायब झाल्याचे चित्र पहायला मिळाले. (छाया : शशिकांत मोरे)

त. भा. प्रतिनिधी

**कोल्हापूर :** शहरात बुधवारी दुपारी १२ वाजून २९ मिनिटे ११ सेकंदांपासून ते १२ वाजून ३० मिनिटांपर्यंत सावली अदृश्य झाली होती, अशी नोंद केली असल्याचे डॉ. कारंजकर यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना याचा अनुभव आणि शास्त्रीय अभ्यास व्हावा, यासाठी वैज्ञानिक उपकरणाद्वारे विवेकानंद महाविद्यालयात प्रत्यक्ष प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी नमुद वेळेत महाविद्यालयाच्या आवारात उभे राहुन सावली गायब झाल्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. 'झिरो शॅडो डे' ही घटना पृथ्वीच्या भौगोलिक स्थितीशी आणि सूर्याच्या आकाशातील स्थानाशी संबंधित आहे. कर्कवृत्त आणि मकरवृत्त या दोन वृत्तांच्यामध्ये राहणाऱ्या लोकांना वर्षातून दोनदा झीरो सावलीचा आनंद घेता येतो, असे डॉ. कारंजकर यांनी सांगितले.

कुठेही जाताना आपली सावली कधीच साथ सोडत नाही, मात्र बुधवारी काही क्षणासाठी साथ सोडल्याने नागरिकांना याचे कुतूहल वाटले. याचा अनुभव घेण्यासाठी नागरिक मोकळ्या जागेत जाऊन उभे राहत होते.



आपल्या दैनंदिन जीवनात सावली हा एक नैसर्गिक भाग असतो. मात्र वर्षातून काही विशिष्ट दिवस असे येतात, जेव्हा दुपारच्या ठराविक वेळी आपली अथवा कोणताही उभ्या वस्तूची सावली काही कालावधीसाठी पूर्णपणे नाहीशी होते. या अद्भुत घटनेला खगोल शास्त्रामध्ये झिरो शॅडो म्हंटले जाते.

### पुन्हा तीन महिन्यांनी मिळणार अनुभव

वर्षातून तीन महिन्यांनी मकर वृत्तावर, नंतर तीन महिन्यांनी पुन्हा विषुववृत्तावर आणि तीन महिन्यांनी कर्क वृतावरती आपणांस शून्य सावली दिवसाचा आनंद घेता येतो. बरोबर तीन महिन्यांनी सूर्याच्या दक्षिणायन काळात ६ ऑगस्ट २०२६ रोजी पुन्हा एकदा शून्य सावलीचा आनंद घेता येणार आहे.

सकाळ कोल्हापूर, गुरुवार, ७ मे २०२६


# कोल्हापूरकरांनी घेतला 'झिरो शॅडो'चा अनुभव

## शहरात दुपारी ५० सेकंदांपर्यंत झाली सावली अदृश्य

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ६ : सूर्य आग ओकत असताना बरोबर १२ वाजता, जे लोक उन्हातान्हात काम, व्यवसायानिमित्त बाहेर पडले होते, त्यांना आपली सावली पुढे दिसत नव्हती. ती पायात आल्याची जाणीव झाली आणि अनोखा खगोलीय अनुभव कोल्हापूकरांनी घेतला. हाच अनुभव त्यांनी इतर मित्र-मैत्रीणींबरोबर शेअर केला.

आज १२ वाजून २९ मिनिटे ११ सेकंदांपासून ते १२ वाजून ३० मिनिटांपर्यंत म्हणजे, ५० सेकंदांपर्यंत सावली अदृश्य झाली. या वैश्विक घटनेला 'झिरो शॅडो' म्हणून ओळखले जाते. विवेकानंद महाविद्यालयातील पदार्थविज्ञान पदव्युत्तर विभागाचे डॉ. मिलिंद कारंजकर म्हणाले, 'पृथ्वीच्या भौगोलिक स्थितीशी आणि सूर्याच्या आकाशातील स्थानाशी संबंधित आहे. कर्कवृत्त आणि मकरवृत्त यांच्यामध्ये राहणाऱ्या लोकांना वर्षातून दोन वेळा हा शून्य सावलीचा आनंद घेता येतो. मात्र, जे लोक कर्क, मकर आणि विषुववृत्त या ठिकाणी राहतात, त्यांना वर्षातून एकदाच शून्य सावली दिवसाचा आनंद घेता येतो.' डॉ. कारंजकर यांनी निरनिराळ्या शास्त्रीय उपकरणांद्वारे सावली कशी नाहीशी झाली, याचे प्रात्यक्षिक विद्यार्थी आणि प्राध्यापकांना दिले. यावेळी प्रा. डॉ. गणेश नवाथे, विद्यार्थी उपस्थित होते.



कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात डॉ. कारंजकर यांनी शास्त्रीय उपकरणांद्वारे सावली नाहीशी झाल्याचे प्रात्यक्षिक विद्यार्थी, प्राध्यापकांना दाखविले.

7/5/26

7/5/26

दैनिक जनप्रवास

बुधवार, दि. २७ मे २०२६

# विवेकानंद कॉलेज म्हणजे गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महाद्वार

## प्राचार्य अभयकुमार साळुंखे



**जनप्रवास : कोल्हापूर**

विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांना वाव देऊन शैक्षणिक वाटचालीमध्ये सामर्थ्य निर्माण करण्याचे ज्ञान केंद्र म्हणजे विवेकानंद कॉलेज आहे. समाजातील निरनिराळ्या स्तरातून आणि परिस्थितीतून येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये परिपूर्ण पोषक स्पर्धेचे वातावरण निर्माण करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करणे हेच अंतिम ध्येय या ज्ञान केंद्राचे आहे, असे मत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी १२ वी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी मांडले.

याप्रसंगी विज्ञान शाखेतील अनुक्रमे पहिले तीन प्रथमेश परमेश्वर काकडे याने ९४.६७ टक्के, श्रद्धा गणपती सुतार ९२.१७ टक्के संचिता नरेंद्र कुलकर्णी यांनी ९२ टक्के, वाणिज्य इंग्रजी माध्यम शाखेतील आर्या वरद दीक्षित आणि अनिश आनंदा संकपाळ यांनी ९५.६७ टक्के, मनुश्री प्रसन्ना शहा ९५.३३टक्के, स्वालीहा चौधरी ९३.३३ टक्के गुण मिळवून प्रथम तीन क्रमांक पटकावले. वाणिज्य मराठी माध्यम शाखेतून साना देसाई ८८.६७ टक्के ,साक्षी बाबासो तोरस्कर, रणवीर राजाराम अनपट यांनी ८६ टक्के, स्नेहल माने ८४. ६७ टक्के गुण मिळवत प्रथम तीन क्रमांक पटकाविले. कला शाखेमधून आभा भूषण कपाले ८७.६७ टक्के, यशोधन नंदकिशोर अनुसे ८७.३३ टक्के ,संस्कृती राजेंद्र रानगे ८४. ८३ टक्के गुण मिळवून प्रथम तीन क्रमांक प्राप्त केले तसेच जिऑलॉजी विषयात ९ विद्यार्थ्यांनी, गणित विषयात ४ व अकौटन्सी विषयात ३ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळविले. अशा सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आला.

अध्यक्षीय मनोगत महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांनी मांडले. महाविद्यालयातील विज्ञान शाखेचा ९९.२७ टक्के वाणिज्य ९२.७४ टक्के शाखेचा कला शाखेचा ८७.६७ टक्के इतका निकाल लागला आहे. सत्कारप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सौ शिल्पा भोसले, कला वाणिज्य विभाग प्रमुख यांनी केले तर आभार विज्ञान शाखाप्रमुख प्रा. मुकुंद नवले यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. वेदांते एस. पी. आणि प्रा. ए. पी.पाटील यांनी केले. या कार्यक्रमास प्राध्यापक, पालक, विद्यार्थी, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

तरुण भारत
बुधवार दि. २७ मे २०२६



कोल्हापूर : नूतन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे समाधीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेला कुलगुरू डॉ. कामत यांची भेट

त. भा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेस मंगळवारी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते त्यांचा संस्थेचे मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या भेटीमध्ये त्यांनी प्रथम शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आणि संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

कुलगुरू डॉ. आर. के. कामत हे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी आहेत. याप्रसंगी कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या एकूण १४ कुलगुरुपैकी ५ कुलगुरु हे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी आहेत. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांची शिदोरी सोबत घेऊन विद्यार्थी ते कुलगुरु पदापर्यंतचा आपला प्रवास झाला आहे. या संस्थेचा विद्यार्थी आहे, याचा आपल्याला सार्थ अभिमान आहे.

यावेळी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, सहसचिव प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, कोल्हापूर विभागप्रमुख डॉ. श्रीराम साळुंखे, संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य एस. एम. गवळी, आजीव सेवक डॉ. आर. व्ही. शेजवळ, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे चेअरमन हितेंद्र साळुंखे, प्रा. महेश साळुंखे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील आदी उपस्थित होते.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
• कोल्हापूर गुरुवार, दि. २८ मे २०२६

# 'विवेकानंद'च्या विद्यार्थ्यांचे कॅम्पस प्लेसमेंटमध्ये यश

- संकेत खद्रेला तब्बल १८ लाखांचे पॅकेज
- गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा



**जनप्रवास : कोल्हापूर**

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित विवेकानंद कॉलेजने आपल्या शैक्षणिक आणि प्रशिक्षण दर्जामधील उत्कृष्टतेची पुन्हा एकदा प्रचिती दिली आहे. कॉलेजच्या बीबीए आणि एमबीएमधील विद्यार्थ्यांची विविध नामांकित नॅशनल आणि मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये उत्तम पॅकिजसह निवड झाली आहे.

बिझनेस ॲनालिटिक्स विभागात शिक्षण घेत असलेल्या संकेत खद्रे याने सर्वाधिक १८ लाख रुपये वार्षिक पॅकिजमिळवलेआहे. ह्युमन रिसोर्समधील श्रेया भोसलेला १० लाखांचे,तर याच विभागातील प्रणाली भामनगोल हिला ५.६ लाखांचे पॅकिज मिळाले आहे. फायनान्स विभागातील कुणाल भोसले याला ४ लाख आणि मार्केटिंगमधील शालिनी जांगीड हिला देखील ४ लाखांच्या पॅकिजची ऑफर मिळाली आहे. याशिवाय इतर अनेक विद्यार्थ्यांची विविध क्षेत्रातील नॅशनल आणि मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये निवड झाली आहे.यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी कॉलेजच्या आवारात विशेष सत्कार झाला. या कार्यक्रमाला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, कॉलेजचे प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील आणि आयक्यूएसी प्रमुख डॉ. श्रुती जोशी, बीबीए आणि एमबीए विभागाचे प्रमुख डॉ. विराज जाधवयांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते निवड झालेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

यावेळी कौस्तुभ गावडे यांनी विवेकानंद कॉलेजमधील बीबीए आणि एमबीए अभ्यासक्रमांमध्ये कौशल्य विकासावर विशेष भर दिला जातो. विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट क्षेत्रासाठी सज्ज करणे आणि त्यांच्यामधून भविष्यातील उत्तम नेतृत्व घडवणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. शिक्षक प्रत्येक विद्यार्थ्यावर खूप मेहनत घेतातआणि आजचे प्लेसमेंटचे यश हे शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या एकत्रित कष्टाचे फळ आहे,असे प्रतिपादन केले. कॉलेजचे प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील, डॉ. श्रुती जोशी यांनी मनोगत मांडले. प्रास्ताविक आणि आभार बीबीए आणि एमबीए विभागाचे प्रमुख डॉ. विराज जाधव यांनी केले.

पुण्य नगरी
गुरुवार, २८ मे २०२६

# विवेकानंद कॉलेजला कुलगुरू डॉ. कामत यांची भेट



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी रविवारी विवेकानंद महाविद्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या समाधीस्थळी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी डॉ. कामत यांचा पुष्पगुच्छ, शाल व संस्थेचे मानचिन्ह देऊन सत्कार केला. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी कुलगुरू डॉ. कामत यांच्या शैक्षणिक योगदानाचा गौरव करताना सांगितले की, डॉ. कामत हे विवेकानंद कॉलेजमधील इलेक्ट्रॉनिक्स विषयाचे माजी विद्यार्थी असून, त्यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेमध्ये शिक्षक म्हणूनही सेवा बजावली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या एकूण चौदा कुलगुरूंपैकी पाच कुलगुरू हे संस्थेचे माजी विद्यार्थी असल्याचा उल्लेखही त्यांनी केला. यावेळी बोलताना डॉ. कामत म्हणाले, 'शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांची शिदोरी सोबत घेऊन विद्यार्थी ते कुलगुरू असा माझा प्रवास झाला आहे.'

यावेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, सहसचिव प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, डॉ. श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. एस. एम. गवळी, डॉ. आर. व्ही. शेजवळ, हितेंद्र साळुंखे, प्रा. महेश साळुंखे, प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील आदी उपस्थित होते.

पुढारी | महाराष्ट्र | कोल्हापूर, शुक्रवार, २९ मे २०२६

# अभ्यासातील सातत्य, शिक्षकांचे मार्गदर्शन हेच यशाचे गमक : कुलगुरू डॉ. कामत

## विवेकानंद कॉलेजला भेट



कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयास भेटीप्रसंगी कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, कौस्तुभ गावडे, डॉ. श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील, हितेंद्र साळुंखे आदी. (छाया : नाज ट्रेनर)

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा एक माजी विद्यार्थी असून, माझ्या जडणघडणीत संस्थेचा मोठा वाटा आहे. सातत्यपूर्ण अभ्यास व शिक्षकांचे अभ्यासपूर्ण मार्गदर्शन यामुळे यश मिळाले आहे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांची शिदोरी सोबत घेऊन विद्यार्थी ते कुलगुरू पदापर्यंतचा प्रवास झाला आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी केले.

विवेकानंद महाविद्यालयास त्यांनी नुकतीच भेट दिली. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व सुशीलादेवी साळुंखे यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी कुलगुरू त्यांचे स्वागत केले. ते म्हणाले, शिवाजी विद्यापीठात कुलगुरू म्हणून नियुक्त झालेले डॉ. कामत संस्थेच्या विवेकानंद कॉलेजमधील इलेक्ट्रॉनिक्स विषयाचे माजी विद्यार्थी आहेत. डॉ. कामत यांनी संस्थेमध्ये शिक्षक म्हणून सेवा बजावली आहे.

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, सहसचिव प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, कोल्हापूर विभागप्रमुख डॉ. श्रीराम साळुंखे, संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. एस. एम. गवळी, आजीव सेवक डॉ. आर. व्ही. शेजवळ, पतसंस्थेचे चेअरमन हितेंद्र साळुंखे, प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील, प्रा. महेश साळुंखे रजिस्ट्रार एस. के. धनवडे उपस्थित होते.